# महाराष्ट्र शासन

## आयुक्त मत्स्यव्यवाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

## सहाय्यक मस्त्यव्यवसाय विकास अधिकारी गट-क (तांत्रिक) राज्यस्तरीय पदभरती

## जाहीरात सन २०१८

**(Short Advertisement)**

---

जाहिरात क्रमांक : ०१ /२०१८. जा.क्र. मत्स्य/प्रशा/१५१२०१/४३/२०१८.

आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हयांना नोडल अधिकारी म्हणून प्राप्त असलेल्या प्राधिकारात विभागातील सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, गट-क (तांत्रिक) या संवर्गाची रिक्त पदे, विहीत शैक्षणिक अर्हता व इतर अटी व शर्ती धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधून भरण्यासाठी, **प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचे मार्फत** स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, सदर जाहीरात महाराष्ट्र शासनाच्या : www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**२. अर्जाचे व परीक्षेचे वेळापत्रक :**

| क्र. | ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची सुरवात | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची अतिंम दिनांक |
|---|---|---|
| १) | दि. २९.१२.२०१८ | दिनांक: २१.०१.२०१९(रात्री -११.५९ PM पर्यंत) |
| २) | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | महापरिक्षा पोर्टलवर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. |
| | टीप :- वरील तारखांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. | |

**पदनाम :- सहाय्यक मस्त्यव्यवसाय विकास अधिकारी,गट-क (तांत्रिक) वेतनश्रेणी :- रु.९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४२००)**

| क्र. | सामाजिक आरक्षण व टक्केवारी | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | | | | | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३० टक्के | खेळाडू ५ टक्के | प्रकल्पग्रस्त ५ टक्के | भुकंपग्रस्त २ टक्के | अपंग ३ टक्के | अनाथ खुला प्रवर्ग १ टक्के | |
| १. | अनुसूचित जाती | ८ | १ | १ | १ | - | - | - | ५ |
| २. | अनुसूचित जमाती | १ | १ | - | - | - | - | - | - |
| ३. | विमुक्त जाती (अ) | १ | १ | - | - | | - | - | - |
| ४. | भटक्या जाती (ब) | १ | - | १ | - | - | - | - | - |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | - | - | - | - | - | - | - |
| ६. | भटक्या जाती (ड) | २ | - | - | १ | - | - | - | १ |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | १ | १ | - | - | - | - | - | |
| ८. | इतर मागास वर्ग | १३ | ४ | १ | २ | १ | - | - | ५ |
| ९. | एसईबीसी | १३ | ४ | १ | १ | - | - | - | ७ |
| | एकूण मागासवर्गीय | ४० | १२ | ४ | ५ | १ | - | - | १८ |
| १०. | खुला | ३९ | ७ | ४ | ४ | २ | २* | १ | १९ |
| | **एकुण** | **७९** | **१९** | **८** | **९** | **३** | **२** | **१** | **३७** |

***१) HH - ०१ (Hearing Handicapped) २) OA - ०१ (One arm affected)**

**सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात** www.mahapariksha.gov.in व महाराष्ट्र शासनाच्या : www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तूत पदांकरीता केवळ उक्त

संकेतस्थळावरुन विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती पक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती पक्रियेच्या माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

स्पर्धात्मक परिक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अशंतः बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार **(वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.)** आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना राहतील तसेच उपरोक्त एकूण पदे दि.३१.०१२.२०१९ पर्यंत भरावयाची असून संदर्भीत पात्र उमेदवारांची निवड यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारांना उपलब्ध होणाऱ्या पदांवर गुणांनुक्रमानुसार प्रथम नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यास आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सक्षम राहतील. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. तसेच दर्शविण्यात आलेल्या संमातर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा शासन विहीत नियमानुसार विचार केला जाईल.

अरुण पुं.विधळे, (भा.प्र.से.)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- २८.१२.२०१८

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२८२१२३९
Tel.No.०२२- २२८२१२३९

फॅक्स क्रमांक ०२२-२२८२२३१२
Fax No. ०२२- २२८२२३१२

महाराष्ट्र शासन
मत्स्यव्यवसाय विभाग
तारापोरवाला मत्स्यालय,नेताजी सुभाष मार्ग, मुंबई ४०० ००२
**GOVRMENT OF MAHARASHTRA**
**DEPARTMENT OF FISHERIES**
Taraporwala Aquarium, Netaji Subash Marg Charni Road Mumbai ४०० ००२
Email ID : commfishmaha@gmail.com

जाहिरात क्रमांक : ०१ /२०१८. जा.क्र. मत्स्य/प्रशा/१५१२०१/४३/२०१८.

आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हयांना नोडल अधिकारी म्हणून प्राप्त असलेल्या प्राधिकारात विभागातील सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी, गट-क (तांत्रिक) या संवर्गाची रिक्त पदे, विहीत शैक्षणिक अर्हता व इतर अटी व शर्ती धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधून भरण्यासाठी, **प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचे मार्फत** स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, सदर जाहीरात महाराष्ट्र शासनाच्या : www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**२. अर्जाचे व परीक्षेचे वेळापत्रक :**

| **क्र.** | **ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची सुरवात** | **ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याची अतिंम दिनांक** |
|---|---|---|
| १) | दि. २९.१२.२०१८ | दिनांकः २१.०१.२०१९(रात्री -११.५९ PM पर्यंत) |
| २) | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | महापरिक्षा पोर्टलवर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. |
| | टीप :- वरील तारखांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. | |

**पदनाम :- सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी,गट-क (तांत्रिक) वेतनश्रेणी :- रु.९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४२००)**

| क्र. | सामाजिक आरक्षण व टक्केवारी | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | | | | | सर्व साधारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३० टक्के | खेळाडू ५ टक्के | प्रकल्पग्रस्त ५ टक्के | भुकंपग्रस्त २ टक्के | अपंग ३ टक्के | अनाथ खुला प्रवर्ग १ टक्के | |
| १. | अनुसूचित जाती | ८ | १ | १ | १ | - | - | - | ५ |
| २. | अनुसूचित जमाती | १ | १ | - | - | - | - | - | - |
| ३. | विमुक्त जाती (अ) | १ | १ | - | - | | - | - | - |
| ४. | भटक्या जाती (ब) | १ | - | १ | - | - | - | - | - |
| ५ | भटक्या जाती (क) | ० | - | - | - | - | - | - | - |
| ६. | भटक्या जाती (ड) | २ | - | - | १ | - | - | - | १ |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | १ | १ | - | - | - | - | - | |
| ८. | इतर मागास वर्ग | १३ | ४ | १ | २ | १ | - | - | ५ |
| ९. | एसईबीसी | १३ | ४ | १ | १ | - | - | - | ७ |
| | **एकूण मागासवर्गीय** | ४० | १२ | ४ | ५ | १ | - | - | १८ |
| १०. | खुला | ३९ | ७ | ४ | ४ | २ | २* | १ | १९ |
| | **एकुण** | **७९** | **१९** | **८** | **९** | **३** | **२** | **१** | **३७** |

***१) HH - ०१ (Hearing Handicapped) २) OA - ०१ (One arm affected)**

**३) सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. **(मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी सेवा वर्ग-२ या संवर्गातील पदोन्नती / पदावनती तसेच सदर पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये संभाव्य बदलाच्या अनुषंगाने वरील पदसंख्येत बदल होण्याची शक्यता आहे.)**

२) उमेदवारांने महाराष्ट्र राज्यात १५ वर्ष वास्तव्य केल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक आहे.

३) राखीव / मागासवर्गीय प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व जात वैधता प्रमाणपत्र (Cast Validity Certificate) कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

४) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १२.१२.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरती मध्ये निवड झालेल्या राखीव / मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारानी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकाच्या ०६ महियाच्या आंत त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेऊन,संबंधीत समितीकडील जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे बंधाकारक राहील. जात वैधता पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले, तर सदर उमेदवाराच्या नियुक्तीचे आदेश रद्द करण्यांत येतील.

५) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

६) ऑनलाईन परीक्षा **A-मुंबई, B-पुणे, C-नागपूर** येथील केंद्रावर घेण्यांत येईल किंवा आवश्यकतेनुसार सदर परीक्षा केंद्रामध्ये बदल करण्याचे अधिकार राखून ठेवण्यांत येत आहेत.

७) निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांचेकडे वशिला लावण्याचा अगर कोणत्याही राजकीय पक्षाचा / व्यक्तीचा दबाव आणल्यास संबंधीत उमेदवारांस अपात्र ठरविण्यांत येईल.

८) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३ अ/ दि. २७ जून, २००८ नुसार ऑनलाईन परीक्षेमध्ये उमेदवारांने एकूण गुणांच्या ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील. तथापि, या संदर्भातील शासन निर्णयानुसार, नियमानुसार व आवश्यकतेनुसार, गुणवत्ता कमी करण्याचा अधिकार निवड समितीस राहील.

९) उमेदवारानी नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षाच्या आत संगणक अर्हता प्रमाणपत्र : D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधाकारक राहील.

१०) प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव जागेवर निवड होणेसाठी अर्ज सादर करतांना विहित प्राधिका-यांनी दिलेले प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

११) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७.१०.२००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार, अंशकालिन पदवीधर (सुशिक्षित बेरोजगारांना) अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ०३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केल्याबाबतचे साक्षांकित प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केल्याबाबतचे साक्षांकित प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१२) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १६.०८.२०१० रोजीच्या पत्रानुसार, उमेदवारांने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेला असल्यास त्या उमेदवारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

१३) मागासवर्गीय उमेदवारांनी कोणत्याही प्रवर्गातून अर्ज सादर केला तरीही सक्षम प्राधिका-याने अदा केलेले जात प्रमाणपत्र ) कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

१४) विवाहीत महिलांनी त्यांच्या विवाहानंतरच्या नावाने अर्ज करावा व प्रत्यक्ष कागदपत्रांची पडताळणी करताना विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत/नावात बदलाबाबतचे शासन राजपत्र अथवा विवाहापूर्वीचे नाव व विवाहानंतरचे नावाबाबत रुपये १००/- च्या बॉंड पेपरवर दोन्ही नावाची एकच व्यक्ती असल्याचे फोटोसह प्रतिज्ञापत्र जोडावे.

..३..

१५) नियुक्त होणा-या उमेदवारास शासन निर्णय दिनांक ०१ नोव्हेंबर, २००५ नुसार लागू करण्यांत आलेली अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू राहील.

१६) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयातील आणि अधिनस्त कार्यालयातील आस्थापनेवरील सदर प्रवर्गासाठी राखीव असलेल्या कोणत्याही जिल्हा/ परिक्षेत्र आस्थापनेवर नियुक्त दिली जाईल. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना ा नियुक्ती आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आंत आदेशित केलेल्या कार्यालयात रुजू व्हावे लागेल. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द करण्यांत येईल व पुढील नियुक्तीस ते अपात्र ठरतील व त्यानंतर निवडसूचीतील प्रतिक्षा यादीनुसार पुढील पात्र उमेदवारांस नियुक्ती दिली जाईल.

१७) प्रत्यक्ष कागदपत्रांची पडताळणी करताना सादर केलेल्या प्रमाणपत्रासह मूळ प्रमाणपत्रांची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारांस नियुक्तीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यांत येईल.

१८) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास प्रमाणपत्र, तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अर्जदार (अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीचे उमेदवार वगळून) इतर मागासवर्गीयांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत सक्षम अधिका-यांनी वितरीत केलेले (Non Cremy-layer Certificate) इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती प्रत्यक्ष कागदपत्रांची पडताळणी करताना सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती हया राजपत्रित अधिकारी, पोष्ट मास्तर, मुख्याधापक व या बाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यांनीच केलेल्या असाव्यात. तसे नसल्यास, किंवा चुकीची माहिती असल्यास उमेदवारांस कोणत्याही क्षणी/स्तरावर अपात्र ठरविण्यांत येईल.

१९) महिला व बाल कल्याण विभागाचे दिनांक २५.०५.२००१ चे शासन निर्णयानुसार खुल्या, इमाव, विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड) व विमाप्र या प्रवर्गातील महिला उमेदवारांना महिलांसाठी राखीव पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी नॉन क्रिमिलियर दाखला सादर करणे आवश्यक राहील. महिलांच्या आरक्षित पदांवर नेमणुकी करिता ज्या महिलांची शिफारस होईल व त्यांची प्रमाणपत्रे व त्यांनी आरक्षित पदांकरिता केलेला अर्ज संबंधीत विभागाने/ कार्यालयाने आयुक्त महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून तपासणी झाले नंतर नियुक्ती देण्यांत येईल.

२०) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २८.०३.२००५, दिनांक ०१.०७.२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अवये, दिनांक २८.०३.२००५ रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र विहित नमन्ुयात सादर करणे आवश्यक राहील.

२१) विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड), इमाव, आणि विमाप्र या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिका-यांचे जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (Non Cremy-layer Certificate) दि.३१.०३.२०१८ पर्यंत सक्षम अधिकाऱ्यांने वितरित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२२) अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळूण आल्यास संबंधीत उमेदवार दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील व भारतीय दंड विधान संहिताचे कलम ११९ व २००(२) प्रमाणे कार्यवाहीस पात्र राहील.

२३) गट-क (तांत्रिक) सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी संवर्गातील पदासाठी मौखिक चाचणी घेण्यांत येणार नाही. फक्त ऑनलाईन परीक्षेच्या गुणांच्या आधारे प्रवर्गानिहाय उमेदवारांची निवडसूची तयार करण्यांत येईल. सदर उमेदवारांस वैद्यकीय तपासणी व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवालाच्या अधिन राहून नियुक्ती आदेश सक्षम प्राधिका-यांकडून निर्गमित होतील.

२४) सदरची रिक्त पदे आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाच्या आस्थापोवरील तसेच प्रादेशिक आणि जिल्हा आस्थापोवरील असून, सर्व कार्यालयातील रिक्त असलेल्या पदांवर नियुक्ती करण्याचे अधिकार अंतिमतः आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे राहतील.

..४..

२५) उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी न करता घेतली जाणार आहे. परंतु उमेदवारांने आपली शैक्षणिक पात्रता व प्रमाणपत्राच्या आधारे ऑनलाईन अर्ज भरणेस हरकत नाही. परंतु, खोटया माहितीची जबाबदारी पूर्णतः उमेदवारावर राहाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणतेही हक्क राहाणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननी व आवश्यक तेथे प्रात्यक्षिक परीक्षानंतर उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय निवड केली जाईल. परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी प्राप्त केलेली प्रमाणपत्रे योग्य माध्यमातून प्राप्त केली नसल्यास किंवा गैरमार्गाने प्राप्त केली असल्यास अथवा खोटी किंवा बनावट असल्याचे दिसून आल्यास उमेदवाराचे नांव भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावरुन बाद करण्यांत येईल. अशा उमेदवारांस नियुक्तीचा हक्क असणार नाही.

**४. विशेष सुचना :-**

१) निवडसमितीने तयार केलेली निवडसूची एक वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करण्यासाठी ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यांत आली आहेत, त्या दिनांकापर्यंत जे नंतर घडेल त्या दिनांका पर्यंत विधीग्राहय ठरेल. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

२) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवार समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २७.०६.२००८ व दिनांक ०२.१२.२०१७ च्या शासन निणर्यामध्ये नमूद केलेल्या तरतुदीनुसार प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

३) भरती बाबत कोणतीही न्यायालयीन प्रक्रीया सुरु झाल्यास किंवा न्याय प्रविष्ट असल्यास त्याबाबत न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून सदर पदे भरणेची कार्यवाही करण्यांत येईल.

४) निवड प्रक्रीया पूर्ण झाले नंतर ६० दिवसांचे कालावधी नंतर प्रश्न पत्रिका व उत्तर पत्रिका नष्ट केल्या जातील किंवा यासंदर्भात शासन ठरविल त्या प्रमाणे उचित कार्यवाही केली जाईल.

**५. अर्ज भरण्याची कार्यपध्दती आणि सूचना :-**

१) उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करुन युजर नेम, पासवर्ड आणि ईमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या /तिच्या प्रमाणित ईमेल आयडीवर सक्रियतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे.(Activation लिंक ही २ दिवसांकरीता activate असेल.) उमेदवाराने त्याची /तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरुन केंव्हाही लॉग ऑन होता येईल.

टीप :- USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल.

२) उमेदवाराचे नांव, वडिलांचे नांव, पतीचे नांव, आडनाव, वडिलांचे नांव, आईचे नांव, जन्मदिनांक,भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल.

३) छायाचित आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती- कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २००pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे (टिप:- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे.)

४) पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्याच्या प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिनकोड इ. सहीत माहिती भरावी.

५) त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने/तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.

६) ज्यांच्याकडे आधारक्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी. समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.

७) तसेच मराठीभाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास) यासंबंधीची माहिती द्यावी लागेल.

८) शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहीरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल.

९) एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की, अर्जदार पूढे या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की, त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशिल संपादीत करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१०) आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल. (Assistant Fisheries Development Officer)

११) त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे.

१२) उमदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केद्राकरीता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तीनही पंसतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांच्या निवड आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परिक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल.

१३) उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने (इंटरनेट बँकिंग, क्रेडीट कार्ड/डेबिट कार्ड, भीम UPI) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल.

१४) ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा अतिम तारखेस मध्यरात्री १२.०० वाजल्यानंतर संकेस्थळावरील लिंक बंद केली जाईल.

१५) जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगइन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परिक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परत केले जाणार नाहीत. उमेदवराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८००३०००७७६६ वर कॉल करा.

**नोंद :-** नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नांव (USERNAME), ई-मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), पसंतीचे स्थान, जन्मतारीख उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**अर्जातीतल माहितीचे पूर्वावलोकन :-**

१. युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगईन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

२. अर्ज प्रिंट करण्यासाठी प्रिंट प्रिव्हयु या पर्यायावर क्लिक करा.

नोंद :- उमेदवारने आपला PDF स्वरुपातील अर्ज संपूर्ण भरती पक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वतः जवळ ठेवावा.

**अर्जातील माहितीचे पूर्वावलोकनः-**

१. युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन `ल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो.

२. अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्हयु "या पर्यायावर क्लिक करा.

नोंद :उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज, परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत स्वतः जवळ ठेवावा.

**महत्त्वाच्या सूचनाः**

१)उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.

२) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.

३) उमेदवार जे वेगवेगळे विभाग/ वेगवेगळ्या पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग /पदे यांकरिता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी . अन्यथा वेगवेगळ्या पदांसाठीच्या परीक्षेसाठी वेगवेगळे परीक्षा केंद्र /शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४)उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.

५) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेलं आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.

६) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही .

६. परीक्षा केंद्रावर ओळखपत्र / प्रवेशपत्रासह परीक्षा सुरु होणेपूर्वी ९० मिनिटे आधी उपस्थित राहाणे आवश्यक आहे. उशिरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेदवारांना परीक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही. तसेच उमेदवारांनी स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, आधारकार्ड इत्यादी सोबत आणावयाचे आहे.

७. सर्वसाधारण **(खुल्या प्रवर्गातील) उमेदवारांसाठी रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये १५०/-(अक्षरी रुपये एकशे पन्नास फक्त) परीक्षा शुल्क** असून सदर आवेदन शुल्क हे ना-परतावा राहील. माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही. तथापि, त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केलेबाबतचे कार्यमुक्त पत्राची साक्षांकित प्रत स्कॅन करुन ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक आहे. सदर कार्यमुक्त पत्राची प्रत सादर न केल्यास वर नमूद केल्या प्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

८. **संवर्ग / पदनिहाय वेतनश्रेणी खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| | | वेतन बँड | ग्रेड वेतन | |
| १ | गट-क (तांत्रिक)<br>सहाय्यक मस्त्यव्यवसाय विकास अधिकारी | ९३००-३४८०० | ४२०० | ७९ |

९. **पात्रतेच्या अटी:-**

९.१ वयोमर्यादा- १९.०१.२०१९ रोजी किमान १८ वर्ष असावे व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

९.२ **उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम:-**

९.२.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ०५ वर्षापर्यत.

९.२.२ पात्र खेळाडूच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत

९.२.३ माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दीपत्रक क्र. मासैक-१०१०/ प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट २०१० आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

९.२.४ शा.नि.साप्रवि.दि.१६ जून २००१ नुसार अपंग व्यक्तीसांठी उच्च वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षांपर्यंत शिथिल.

**१०. संवर्ग / पदनिहाय शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | पदनाम | अर्हता | वयोमर्यादा |
|---|---|---|---|
| १. | सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी गट-क (तांत्रिक) | १) मान्यता प्राप्त विद्यापिठाची मत्स्यविज्ञान **(BFSc)** विषयांची पदवी **(Bachelor of Fisheries Science)** (पेपर्स किंवा प्रबंधाने ) द्वितीय श्रेणी उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२) प्रथम पदस्थापनेपासून ०२ वर्ष परिविक्षा कालावधी आवश्यक राहील.<br>३) प्रत्यक्ष नियक्ती झाल्यानंतर शासनाची विहीत मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसल्यास सदर परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.<br>४) महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने वेळोवेळी विहित केलेल्या संगणक अर्हता प्रमाणपत्र प्राप्त केलेले असणे आवश्यक. | खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे आणि मागास -वर्गीयांच्या बाबतीत ४३ वर्षे |

१०.१ हिंदी आणि मराठी भाषा परिक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परिक्षा उत्तीर्ण झालेली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसेल तर, ती परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१०.२ संगणकाच्या ज्ञानासंदर्भात शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/ २००१/ ३९, दि.१९/३/२००३ व माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) दि.४/२/२०१३ नुसार अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

१०.३ ८.६ सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी या पदाकरीता एकूण २०० गुणांची परिक्षा राहील. यापैकी ४०% गुण मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता राहतील. ६०% गुण B.F.Sc या पदवी परिक्षेशी संबंधीत विषयांवरील प्रश्नांकरीता राहतील.

११. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक आर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे.

**१०. भरतीचा कार्यक्रम खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यत |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी करण्याचा कालावधी<br>Online Registration | २९.१२.२०१८ | २१ /०१/२०१९ |
| २. | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक<br>Online Examinition Date | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक व वेळ आणि इतर माहिती एस्.एम्.एस्.द्वारे नंतर कळविण्यात येईल. तसेच उमेदवारांनी वेळोवेळी आपल्या लॉग-इन-आयडी द्वारे याबाबतची अद्ययावत माहिती प्राप्त करुन घेण्याची आवश्यक ती दक्षता घ्यावी. | |

(अधिक माहिती www.mahapariksha.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे)

अरुण पुं.विधळे, (भा.प्र.से.)
आयुक्त मत्स्यव्यवसाय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

ठिकाण :- मुंबई
दिनांक :- २८.१२.२०१८